प्रेसनोट दिनांक ०२/०२/२०२१

**आरोपी लोकसेवक गुरुप्रसाद विनायक कोसगी वय ४७ वर्षे, पद उप कार्यकारी अभियंता वर्ग २, नेमणुक महावितरण कार्यालय, उदगीर जि. लातूर यांनी ५,०००/— रुपयांची लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांनी ग्राहकाच्या वतीने महावितरण कार्यालयास १.३ डीडीएफ योजनेअंतर्गत डी.पी. चे कनेक्शनच्या मागणी केली होती. त्या प्रस्तावानुसार ईस्टीमेट तयार करुन त्यावर नोट लिहुन स्वाक्षरी करुन प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांचेकडे मंजूरी करीता पठविण्यासाठी उप कार्यकारी अभियंता यांनी ५,०००/—रुपये लाचेची मागणी कली असल्या बाबतची तक्रार आज दिनांक ०२/०२/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालय लातूर यांचेकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून आज दिनांक ०२/०२/२०२१ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक गोसगी, उप कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांनी ग्राहकाच्या वतीने महावितरण कार्यालयास १.३ डीडीएफ योजनेअंतर्गत डी.पी. चे कनेक्शनच्या मागणी केलेल्या प्रस्तावानुसार ईस्टीमेट तयार करुन त्यावर नोट लिहुन स्वाक्षरी करुन प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांचेकडे मंजूरी करीता पठविण्यासाठी ५,०००/—रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवक गोसगी, उप कार्यकारी अभियंता यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक ०२/०२/२०२१ रोजी महावितरण कार्यालय उदगीर येथे पाठविले असता आरोपी लोकसेवक गोसगी, उप कार्यकारी अभियंता यांनी ५,०००/—रुपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम १४.४५ वाजता पंचासमक्ष उदगीर महावितरण कार्यालयात स्वतः स्विकारली आहे. म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन उदगीर शहर येथे कलम ७, ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक, कुमार दराडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, रमाकांत चाटे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारीहे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र :— मोबाईलक्रमांक ८८८८८४१९६५
२) माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक :— मोबाईलक्रमांक ९९२३६६६६४४
३) कुमार दराडे पोलीस निरीक्षक :— मोबाईलक्रमांक ९६५७७०९८४१
४) बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक :— मोबाईलक्रमांक ९०६७२६६२६४
५) टोल फ्री हेल्पलाईन कमांक :— १०६४
६) कार्यालयाचा फोन कमांक :— ०२४८२—२४२६७४
७) Website :— www.acbmaharashtra.gov.in
८) Mobile App :— www.acbmaharashtra.net
९) Facebook Page :— www.facebook.com/MaharashtraACB

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर